जा.क्र. व्यविविचा/ ५६२ /२०१९,
व्यवस्थापक मुंबई विकास विभाग चाळी
यांचे कार्यालय, बी.डी.डी. चाळ क्र. ५१
(तळमजला),वरळी, मुंबई- ४०० ०१८.
दिनांक- ११\०३\२०१९

प्रति,
कार्यकारी अभियंता (बी.डी.डी.)
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ,
वांद्रे, मुंबई 51

आवक क्र. : ७८४
दिनांक : १५/०३/२०१९
का.अ. / बीडीडी/मुं.मं.

Chavan
pl. upload
15/3

विषय - बी.डी.डी. चाळी संबधील महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेले आदेशाची प्रत सादर करणे बाबत.

बी.डी.डी. चाळी संबधील महाराष्ट्र शासनाने आजपावेतो काढलेल्या आदेश/सूचनांच्या छायांकित प्रती सोबत आपल्या माहितीसाठी सादर करीत आहे.

व्यवस्थापक
मुंबई विकास विभाग चाळी
वरळी, मुंबई – १८.

प्रत:- संचालक मुंबई विकास विभाग चाळी वरळी मुंबई 18 यांना माहीतीसाठी सविनय सादर.

No. DDC; 1057-111950-G,
Labour & Social Welfare Department
Old Secretariat Building,
Bombay, 26th May 1958.

To,

The Director,
D. D. Chawls,
Bombay.

Subject : Transfer of tenancies in the names of the close relatives such as sons, daughters etc..

Reference your letter No. IHS/2059/57/dated 27th November 57.

2. Government is pleased to authorise the Manager, D.D.Chawls to transfer the tenancy rights in the name of close relatives of the bonafide tenants provided the following conditions are satisfied :

1) The close relative falls within the category of relatives as defined in Government Endorsement, Public Works Department, No.RS.94/95868-A, dated 25th September, 53

2) The bonafide tenant surrenders his tenancy right in the prescribed form ( copy enclosed).

3) A joint application is received from the parties concerned.

4) The close relative agrees to pay the economic rent and executes a fresh tenancy agreement with Government by paying one month's rent in advance.

5) That an affidavit about the relationship with the bonafide tenant is produced.

6) That the relative should have stayed with the bonafide tenant at least for two years prior to the date of application for transfer. Documentary evidence will have to be produced to this effect.

7) That there are no arrears of any kind.

Sd/-
(A.A.HAFEEZ,
Special Officer
Labour & Social Welfare Department.

No. IHS/ /of 1958
Office of the Director, D.D.Chawls,
P.W.D.Secretariat Building (Old),
Bombay No. I, May 1958.

Copies to :

1) The Manager, D.D.Chawls, for information and necessary action, and

2) The Dy.Director, D.D.Chawls, (Legal) for information and guidance.

Sd/-
Director's Clerk

1973

GOVERNMENT OF MAHARASHTRA

No. DDC 1071/80936-E
URBAN DEVELOPMENT, PUBLIC HEALTH
AND HOUSING DEPARTMENT:
Sachivalaya, Bombay.

January 1973.

12 JAN 1973

To

The Director of Development Department Chawls,
Old P.W.D.Building, Opp.C.T.O.
Bombay, Fort-1.

Subject: Transfer of tenancy of B.D.D.Chawl Room - liberalising the rules - regarding

The existing list of the relatives who should be considered eligible for transfer of tenancy is laid down in Government letter, Public Works Department No.DDC-1152-A, dated 3rd January,1953. In supersession of that list,Government is pleased to approve the following revised list of relatives of the tenant for the purpose of transfer of tenancy -

List of relatives of the original tenant.

i) His or her spouse.
ii) Unmarried son and daughter
iii) Married son with wife and their children
iv) Widowed daughter and/or her unmarried children
v) Father and mother
vi) Married brother and sister with their spouse and/or their children
vii) Unmarried brother and sister
viii) Widowed sister or/and her unmarried children
ix) Grand parents
x) Married daughter with her husband and/or their unmarried children
xi) Sons and daughters of brothers and sisters
xii) Brother-in-law with wife and/or their unmarried children
xiii) Wife's unmarried sisters.
xiv) Mother-in-law and father-in-law (both of the tenant and/his/her spouse)
xv) Uncle and Aunt (Paternal and maternal)
xvi) Unmarried children of uncle and aunts

2. Also step relationships as correspond to the above list should be included.

3. In future transfer of tenancy should be allowed in the name of the a relative mentioned in the above list provided, such relative is staying in the tenement continuously for two years with the original tenant and is able to produce concrete proof about his residence.

(S.V.Chakradeo)

Copy to :

The Manager, D.D.Chawls, Worli, Bombay 18;

The Competent Authority for Greater Bombay,
Old P.W.D.Building, Opp.C.T.O., Fort, Bombay.

E Branch for Select File;

क्रमांक : डीडीसी १०८३/१२८४/का.४,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ११ डिसेंबर, १९८६.

प्रति,

संचालक,
मुंबई विकास विभाग चाळी कार्यालय,
गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८.

विषय :- निवासी गाळे कायदेशीर वारसाच्या नावांवर करण्याकरिता उत्तराधिकार प्रमाणपत्र घेण्याबाबत

उपरोक्त विषयावरील आपले क्र.आयएचएस ७२२ ऑफ १९८५, दिनांक १३.६.१९८५ चे पत्र कृपया पहावे.

२. मुंबई विकास विभाग चाळीतील निवासी गाळे मयत अधिकृत भाडेकरुंच्या कायदेशीर वारसांच्या नांवे हस्तांतरीत करण्यासाठी त्यांना ॲडमिनिस्ट्रेटिव्ह जनरल, हायकोर्ट, यांचेकडून उत्तराधिकार प्रमाणपत्र घेऊन ते सादर करण्याबाबतचा आपला प्रस्ताव शासनाने विचारान्ती अमान्य केला आहे. तथापि, अशी हस्तांतरणाची प्रकरणे निकाला काढणे सुलभ व्हावे या दृष्टिने खालीलप्रमाणे तरतुद करण्यात येत आहे.

३. यापुढे मयत अधिकृत भाडेकरुंच्या कायदेशीर वारसांनी हस्तांतरणासाठी केलेल्या अर्जासोबत खालील कागदपत्र सादर करावेत.

१] मूळ अधिकृत भाडेकरु मयत झाल्याचे प्रमाणपत्र.

२] अर्जदार, मयत अधिकृत भाडेकरुंच्या कायदेशीर वारस असल्याबाबतचा पुरावा :-

अ] विवाह प्रमाणपत्र किंवा

ब] शपथपत्राचे आधार असलेले राजपत्रित अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

क] रेशन कार्ड.

३] मयत अधिकृत भाडेकरुच्या कुटुंबातील इतर सदस्यांनी दिलेले "ना हरकत प्रमाणपत्र."

1706

४] प्रस्तावित हस्तांतरितीने [ Proposed Transferee ] त्यांच्या/तिच्या किंवा त्यांच्या बायकोच्या/तिच्या नवऱ्याच्या नांवावर बृहन्मुंबईत कोठेही जागा नाही असे ...

मुंबई विकास विभाग चाळी अंतर्गत अनधिकृत गाळेधारकांची भाडेदारी **नियमित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र.विविचा–११९०/(५९४७)/गृनिप–१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११.१०.१९९४

वाचा :- शासन पत्र (तत्कालीन) नगर विकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.डोडीसी–१९६१/१५७४१/ई, दि.२५.१०.१९६२.

शासन निर्णय :-

मुंबई विकास विभाग चाळी अंतर्गत दि.२१ मे,१९५९ रोजी जे अनधिकृत रहिवाशी सातत्याने वास्तव्य करीत होते त्यांच्या नांवे संबंधित गाळयांची भाडेदारी काही अटी व शर्तींवर हस्तांतरीत करण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधिन आदेशान्वये घेतलेला आहे. त्यानंतर दि.२१.५.१९५९ या दिनांकामध्ये कोणतीच सुधारणा करण्यात आलेली नसल्यामुळे सदरहू दिनांकात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार, दि.२१.५.१९५९ नंतर जे अनधिकृत गाळेधारक मुंबई विकास विभाग चाळी अंतर्गत वास्तव्य करुन आहेत, त्यांची भाडेदारी नियमित करण्याचा दिनांक २१.५.१९५९ नंतर १.५.१९९४ पर्यंत वाढवून देण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे. अशी भाडेदारी नियमित करण्यासाठी खालील अटी व शर्ती निर्धारित करण्यात आलेल्या आहेत:–

अ) संबंधित अनधिकृत गाळेधारकाचे दि.१.५.१९९४ पूर्वी किमान २ वर्षे सातत्याने वास्तव्य/व्यवसाय असल्याचा योग्य तो पुरावा संबंधित अनधिकृत गाळेधारकाला द्यावा लागेल. त्यासाठी शिधावाटपपत्रिका आणि/किंवा पत्रव्यवहार, इलेक्ट्रीक

बील, टेलिफोन बील, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवाना आदी बाबी ग्राह्य धरण्यात येतील.

ब) भाडेदारी नियमितीकरणासाठी संबंधित अनधिकृत गाळेधारकास निवासी गाळयांकरिता प्रति गाळा रु.१०,०००/- व अनिवासी गाळयांकरिता प्रति गाळा रु.२०,०००/- हस्तांतरण शुल्क अदा करावे लागेल. त्याप्रमाणे भाडेदारी हस्तांतरणाच्या दिनांकापर्यंत सगळे नियमित थकीत भाडे अदा करावे लागेल. या हस्तांतरण शुल्कातून कायदेशीर वारसाची प्रकरणे वगळण्यात येतील.

क) व्यायामशाळा/सामाजिक संस्था/पतपेढया या नोंदणीकृत संस्थांना दिलेल्या गाळयांची भाडेदारी उस्ताद/सभापती किंवा सचिव यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात येईल व नोंदणी न झालेल्या संस्थांच्या नांवे भाडेदारी हस्तांतरीत न करता त्यांच्याविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

ड) कायदेशीर वारसाच्या नावे भाडेदारी हस्तांतरणासाठी मयत अधिकृत भाडेकरुच्या कायदेशीर वारसाला शासन पत्र, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र.डीडीसी१०८३/१२८४/का.४,दि.११.१२.१९८६ च्या आदेशात नमूद केलेली कागदपत्रे सादर करावी लागतील.

इ) मुंबई विकास विभाग चाळीमधील गाळयांच्या विद्यमान भाडे दरात वाढ झाल्यास वाढीव दराने भाडे भरण्याविषयीचे हमीपत्र संबंधित अनधिकृत गाळेधारकास द्यावे लागेल.

फ) उपरोक्त भाडेदारी नियमितीकरणाच्या निर्णयाचा लाभ सेवेत असलेल्या व सेवानिवृत्त शासकिय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनाही याद्वारे देण्यात येत

आहे. मात्र त्यांना हस्तांतरण शुल्कातून वगळण्यात येत आहे.

फ) भाडेदारी नियमितीकरणाचा शासनाचा हा निर्णय बी.डी.डी.चाळी परिसरात ठिकठिकाणी सूचना फलक लावून संबंधितांच्या निदर्शनास आणावा. तसेच अनधिकृत गाळेधारकांची भाडेदारी नियमितीकरणाची कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून ९ महिन्यात पूर्ण करण्यात यावी. त्यात काही अडचणी असल्यास अशी प्रकरणे शासनाच्या निर्णयासाठी पाठविण्यात यावीत.

२. वरीलप्रमाणे भाडेदारी हस्तांतरणाचे अधिकार संचालक/व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग चाळी यांना राहतील व पदसिध्द संचालक म्हणून सक्षम प्राधिकारी ह्यांना शासन पत्र, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र.डीडीसी-१०७५/९११/का.९, दि.३१.८.८९ अन्वये दिलेले अधिकार याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबईकरिता यांनी शासन परिपत्रक क्र.गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र.ईव्हीसी-१०८३/(१२७५)/का.९, दि.२४.५.१९८५ अन्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे मुंबई शासकिय वास्तु (निष्कासन) अधिनियम,१९५५ मधील तरतुदीनुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराच्या कक्षेत कामकाज करावे.

३. निवासी/अनिवासी गाळयांच्या भाडे करारपत्रातील अटींचा भंग, भाडे थकबाकी, गाळयांमध्ये अनधिकृत बांधकाम, वारसाहक्कदाराची वादग्रस्त प्रकरणे, अनधिकृत गाळयांचे हस्तांतरण, पोट भाडेकरु आदी बाबतीतील निष्कासन कारवाई नेहमीप्रमाणे करण्यात यावी. मात्र तत्पूर्वी त्याला शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

४. अनिवासी गाळयांतील व्यवसायासाठी, व्यावसायिक भागीदार नेमणे अथवा व्यवसायात बदल करणे यासाठी शासनाच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता राहील. अन्यथा संबंधित गाळेधारकाविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

५. मुंबई विकास विभाग चाळी अंतर्गत गाळ्यांमधील दि.१.५.१९९४ च्या पुढील अनधिकृत रहिवास/व्यवसाय आढळून आल्यास त्यासाठी सध्याच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे दरमहा दर चौ.फूटास रु.५/- प्रमाणे दंडनीय भाडे आकारणी करण्यात यावी. मात्र अनधिकृत वैयक्तिक व्यवसायासाठी सध्याच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे दरमहा दर चौ.फूटास रु.२/- प्रमाणे भाडे आकारण्यात यावे. त्याचप्रमाणे त्यांच्याविरुध्द निष्कासनाची कारवाई शासनाच्या मान्यतेने तात्काळ सुरु करावी.

६. मुंबई विकास विभाग चाळी अंतर्गत रिक्त गाळयांच्या वितरणाचे पूर्ण अधिकार यापुढे शासनास राहतील.

७. संचालक/व्यवस्थापक यांच्या आस्थापनेवरील वृतीय वर्ग कर्मचा-यांना गाळयांच्या उपलब्धतेनुसार केवळ ते शासकिय सेवेत असेपर्यंत कमाल २ गाळयांचे वितरण शासकिय निवासस्थान म्हणून शासनाच्या पूर्व परवानगीने करण्यात येईल.

८. मुंबई विकास विभाग चाळींच्या पुनर्बांधणीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे सदर चाळींचे भवितव्य ठरविल्याशिवाय या चाळींच्या परिसरातील मोकळया जागा व्यवसायासाठी वा अन्य कारणासाठी कोणत्याही व्यक्तीस/संस्थेस भाडेपट्टयाने देण्यात येऊ नयेत.

९. वरील परिच्छेद १(ड) व २ मध्ये उल्लेखिलेले दि.११.१२.८६ व दि.२४.५.१९८५ चे आदेश, तसेच जवळचे नातेवाईक या सदरात भाडेदारी हस्तांतरणासाठी शासन पत्र, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र.डीडीसी-१०७१/८०१३६/ई दि.१२.१.७३ च्या आदेशान्वये निश्चित केलेली नातेवाईकांची यादी, विद्यमान भाडेदराचे शासन निर्णय, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र.डीडीसी १०६८/४०३२६/ई, दि.३१.७.१९६९ चे आदेश, सेवानिवृत्तीनंतर गाळे ताब्यात ठेवण्यास चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना परवानगी देण्याचे शासन परिपत्रक, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्र.डीडीसी १९७२/७४७५४ एल, दि.१२.३.१९७५

चे आदेश यापुढेही अंमलात राहतील. उक्त आदेश वगळता मुंबई विकास विभाग चाळींच्या व्यवस्थापनाविषयी यापूर्वीचे अस्तित्वात असलेले सर्व प्रशासकिय आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

८. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(या.हि.कांबळे)
उप सचिव,महाराष्ट्र
शासन.

प्रति,

१) सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबईकरिता, जुने जकात घर, मुंबई.
२) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई १८.
३) व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग चाळी, गणपत जाधव मार्ग, वरळी मुंबई १८.
४) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५) मा.मंत्री (गृहनिर्माण), यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव
७) गृहनिर्माण विभागातील सर्व अधिकारी.
८) का.गृनिप-१ (संग्रहार्थ)

क्रमांक: विविधा - १०९५/१११५/गृनिप-१,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- 23 नोव्हेंबर १९९५

संचालक,
मुंबई विकास विभाग चाळी,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मुंबई- ४०० ०१८.

व्यवस्थापक,
मुंबई विकास विभाग चाळी,
गणपत जाधव मार्ग, वरळी,
मुंबई- ४०० ०१८.

विषय:- बी.डी.डी. चाळी अंतर्गत "जवळचे नातेवाईक" या सदराखाली मोडणारी भाडेदारी हस्तांतरणाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेबाबत ...

महोदय,

मुंबई विकास विभाग चाळी अंतर्गत निवासी/ अनिवासी गाळ्यांमध्ये वास्तव्य/व्यवसाय करीत असलेल्या अधिकृत भाडेकरुंच्या संबंधित गाळ्यांची भाडेदारी त्यांच्या नातेवाईकांच्या नांवावर हस्तांतरीत करण्याबाबत शासन पत्र, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. डी.डी.सी. १०७१/८०९३६/ई, दिनांक १२.१.१९७३ अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे अशी प्रलंबित प्रकरणे आपण संयुक्तरित्या सुनावणी घेऊन या संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर निकाली काढावीत. ही प्रकरणे निकाली काढतांना काळजीपूर्वक तपासावीत व संबंधितांच्या तक्रारींना वाव राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

त्याच प्रमाणे याबाबतची माहिती सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्या-प्रमाणे शासनास वेळोवेळी कळविण्यात यावी.

आपला विश्वासू,

(अ.शां. नगराळे)
शासनाचे अवर सचिव.

सोबत- विवरणपत्र

**मुंबई विकास विभाग चाळीतील वाणिज्यिक वापराकरीता असलेल्या गाळयांची तथा स्टॉलची भाडेवाढ करण्याबाबत.**

५

# महाराष्ट्र शासन.

गृहनिर्माण विभाग,

शासन निर्णय क्रमांक विविचा २००१/प्र.क्र.१२०(भाग-२)/गृनिप-१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३ ऑक्टोबर, २००१.

वाचा :- इंग्रजी शासन निर्णय क्रमांक इडीसी १०६८/४०३२८/ई, दि. ३१ जुले, १९६९.

**प्रस्तावना** :- मुंबई विकास विभाग चाळीतील निवासी/अनिवासी तथा स्टॉलचे भाडे दि. ३१.७.१९६९ च्या शासन निर्णयाव्दारे ठरविण्यांत आलेले आहे. तद्नंतर यात वाढ करण्यांत आलेली नाही. बी.डी.डी. चाळीवर होणारा देखभाली व दुरुस्तीचा खर्च दर वर्षी सुमारे रु.६ कोटी इतका येतो. हा खर्च कमी करण्याच्या दृष्टीकोनातून बी.डी.डी. चाळीतील वाणिज्यिक वापराकरीता ( कमर्शिअल) असलेले अनिवासी गाळे तथा स्टॉलचे भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- मुंबई विकास विभाग चाळीतील वाणिज्यिक वापराकरीता (कमर्शिअल) असलेले अनिवासी गाळे संस्था, अधिकृत स्टॉल व दंडनीय आकाराने वापरात असलेले अनधिकृत स्टॉल यांची भाडेवाढ करण्याचे शासनाने निर्णय घेतलेला आहे. ही भाडेवाढ खालीलप्रकारे असेल.

| अ.क्र | गाळयाचा प्रकार | गाळयाची संख्या | सध्याचे द.म. भाडे + विद्युत आकार | प्रस्तावित मासिक भाडयाचा दर (प्रती चौ.फु.) | प्रस्तावित एकूण दरमहा + विद्युत आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | अनिवासी गाळे<br>अ) दुकानी | ३३३ | ४०+२=४२<br>४५+२=४७<br>५०+२=५२<br>६५+२=६७ | ३.०० | ४८०+५= ४८५ |
| | | | | २ | ३२०+५=३२५ |
| | ब) इतर भटारखाना, भांडाररुम, तालीम | ७३ | २५+२=२७ | ०.७५ | १२०+५=१२५ |
| २. | संस्था | ३४५४ | १५+२=१७ | रु.५ | रु.३०० सुमारे |
| ३. | अधिकृत स्टॉल/जागा (सुमारे १०X६) | १७५ | प्र.चौ.फु. २.०० | रु.१० | रु.४८० सुमा |
| ४. | दंडनीय दराने असलेले अनधिकृत स्टॉल्स (सुमारे ६X८) | १०१ | २५ | | |

ही भाडेवाढ दि. १.४.२००१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यांत येईल.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(श.य.सोनावणे.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई १८.
२. व्यवस्थापक, मुंबई विकास विभाग चाळी, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई १८.
३. सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबईकरीता, जुने जकात घर, मुंबई.
४. सचिव, सार्वजनि बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
५. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
६. मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे खाजगी सचिव.
८. मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव.
९. गृहनिर्माण विभागातील सर्व अधिकारी.
१०. कार्यासन गृनिप-१(संग्रहार्थ)
११) मंत्री/राज्यमंत्री मंत्रालय, मुंबई-३२

**बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : विविचा २०१६/प्र.क्र. २६१/गृनिप**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २८ जून, २०१७

वाचा - १) गृहनिर्माण विभाग शासन पत्र क्रमांक : डीडीसी १०८३/१२८४/का.४, दि.११.१२.१९८६.
२) शासन निर्णय क्र. विविचा-११९०/(५९४७)/गृनिप-१, दि. ११.१०.१९९४
३) शासन निर्णय क्रमांक : विविचा २००७/प्र.क्र. ५१ (भाग-१)/गृनिप, दि. ३० मार्च, २०१६.
४) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक : टिपीबी ४३१३ /४००/ प्र.क्र. १०४/२०१६/नवि-११, दि. २७ डिसेंबर, २०१६
५) शासन निर्णय क्रमांक : विविचा २०१६/प्र.क्र. २६१/गृनिप, दि.०१ मार्च, २०१७.
६) शासन निर्णय क्रमांक : विविचा २०१६/प्र.क्र. २६१ (भाग-१)/गृनिप, दि.१४ जून, २०१७.

**प्रस्तावना -**

शासनाच्या संदर्भाधिन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मुंबईतील वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग व शिवडी येथील मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर पुनर्विकासाकरीता संदर्भाधिन क्र. ४ येथील अधिसूचने अन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नविन विनियम ३३ (९) (ब) अंतर्भूत करण्यात आलेला आहे तसेच संदर्भाधिन क्र. ५ व ६ येथील शासन निर्णयान्वये बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता लाभार्थींची पात्रता निश्चित करणे व अन्य अनुषंगिक बाबींसाठी सक्षम प्राधिकारी व अपिल प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

१. संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी बी.डी.डी. चाळींतील इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या निवासी/अनिवासी गाळेधारकांची पात्रता या शासन निर्णयाच्या विवरणपत्र “अ” व “ब” मध्ये नमुद केलेल्या पुराव्यांच्या आधारे निश्चित करावी.

२. संदर्भाधिन क्र. १ च्या शासन पत्रान्वये बी.डी.डी. चाळीतील इमारतीमधील निवासी / अनिवासी गाळे कायदेशीर वारसाच्या नावावर करण्याकरीता उत्तराधिकार प्रमाणपत्रे घेण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात

आल्या आहेत. सदर पत्रातील परिच्छेद- ३ येथील अट क्र. ४ वगळण्यात येत आहे. बी.डी.डी. चाळीतील इमारतींमधील भाडेकरुंच्या कायदेशीर वारसांच्या नावे हस्तांतरण करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये संचालक, बी.डी.डी. चाळी यांनी शासनाच्या दि. ११.१२.१९८६ च्या पत्रातील अन्य सुचना / अटी विचारात घेऊन हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करावी.

३. बी.डी.डी. चाळीतील इमारतींमध्ये दि. १३.०६.१९९६ रोजी भाडेदारी अस्तित्वात असलेल्या व भाडेदारी नियमितीकरण झालेल्या व्यक्तीने अन्य व्यक्तीस भाडेदारीचे हस्तांतरण (विक्री) केलेल्या प्रलंबित प्रकरणामध्ये (या शासननिर्णयाच्या दिनांकापर्यंतच्या) संचालक, बी.डी.डी. चाळी यांनी भाडेदारी हस्तांतरणाबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. सदर गाळ्यामध्ये दि. १३.०६.१९९६ रोजी भाडेदारी अस्तित्वात असल्याबाबतचा विवरणपत्र **"अ"** येथील पुरावा तसेच सदर नियमित भाडेकरुने अन्य व्यक्तीस हस्तांतरण केल्याबाबतचा वैध करारनामा आणि सद्याचे अस्तित्व दर्शविणाऱ्या अन्य वैध पुराव्याच्या आधारे हस्तांतरणाबाबतची सदर कार्यवाही करण्यात यावी. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय दि. ११.१०.१९९४ मधील अट **"ब"** येथे नमूद केल्याप्रमाणे निवासी गाळ्याकरीता रु. १०,०००/- प्रति गाळा व अनिवासी गाळ्याकरीता रु. २०,०००/- प्रति गाळा इतके हस्तांतरण शुल्क घ्यावे त्याचप्रमाणे नियमानुसार अन्य आवश्यक वसुली करण्यात यावी.

४. बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाकरिता पात्रता / अपात्रता ठरविंताना एखाद्या रहिवाश्याकडे त्याच्या नांवे / त्याच्या पत्नीच्या नावे / त्याच्या मुलांच्या नावे एका पेक्षा सलग असलेल्या अथवा सलग नसलेल्या स्वतंत्र खोल्यांसाठी/गाळयांसाठी स्वतंत्र भाडेपावती अथवा भाडेदारी करारपत्रे असल्यास त्यांना स्वतंत्र गाळे म्हणून पात्र धरण्यात यावेत. तसेच जर एका रहिवाश्याकडे एकापेक्षा जास्त सलग खोल्या असल्यास परंतु एकच भाडेपावती/भाडेदारी करारपत्र असल्यास त्यांची स्वतंत्र पात्रता धरण्यात येऊ नये.

५. शासनाच्या संदर्भाधिन क्र. ३ मधील निर्णय क्र. ७ नुसार शासकीय विभागांना बी.डी.डी. चाळींतील सेवा निवासस्थाने म्हणुन जेवढ्या सदनिका देण्यात आलेल्या आहेत, तेवढ्या पुनर्वसन सदनिका संबंधित शासकीय (प्रशासकीय) विभागांना उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने सदर सेवा निवासस्थानातील सदनिका धारकांना (शासकीय सेवकांना) या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहणार नाहीत. (सदर सेवा सदनिका व त्यातील शासकीय सेवकांची माहिती संचालक, बी.डी.डी. चाळी यांनी सक्षम प्राधिकारी यांना विनाविलंब उपलब्ध करुन द्यावी.)

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१७०६२८१७४८५४५९०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Baliram Pawar

Digitally signed by Baliram Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=befef6531a9fedce4a48730f8247a42dc24c79ec385832aa53bf063e6d139980, cn=Baliram Pawar
Date: 2017.06.28 17:47:39 +05'30'

(बी.जी. पवार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
४) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७) मा. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
८) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा)
१०) महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा)
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
१२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई .
१३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई - ३२.
१४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, म्हाडा
१५) गृहनिर्माण विभागातील उप सचिव / सर्व अवर सचिव/ सर्व कक्ष अधिकारी
१६) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर, मुंबई - ३२.
१७) उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), कुलाबा विभाग, मुंबई शहर, मुंबई - ३२.
१८) उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), धारावी विभाग, मुंबई शहर, मुंबई - ३२.
१९) निवड नस्ती - गृनिप.

## विवरणपत्र "अ"

बी.डी.डी. चाळींतील इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या निवासी/अनिवासी गाळेधारक लाभार्थींची पात्रता निश्चितीकरीता आवश्यक असलेले पुरावे.

**दि. १३.०६.१९९६ या दिनांकास संबंधित गाळ्यांमध्ये भाडेदारी अस्तित्वात होती. हे दर्शविण्यासाठी खालीलपैकी कोणताही एक पुरावा सादर करणे आवश्यक राहील :-**

१) संचालक / व्यवस्थापक बी.डी.डी. चाळी यांनी दिलेली दि. १३.०६.१९९६ या दिनांकापूर्वीची भाडेपावती.

२) संचालक / व्यवस्थापक बी.डी.डी. चाळी यांच्याबरोबर तत्कालीन गाळेधारकाने दि. १३.०६.१९९६ या दिनांकापूर्वी केलेला भाडेदारी करारनामा / भाडेदारी नियमितीकरण / हस्तांतरण आदेश.

३) दि. १३.०६.१९९६ या दिनांकापूर्वीचे तत्कालीन गाळेधारकाच्या नावे असलेले सदर गाळ्याचे वीज देयक.

४) दि. १३.०६.१९९६ या दिनांकापूर्वीचे तत्कालीन गाळेधारकाच्या नावे असलेले सदर गाळ्याचे दूरध्वनी देयक.

५) दि. १३.०६.१९९६ पूर्वी प्रकाशित झालेल्या अंतिम मतदार यादीचा प्रमाणित उतारा (तत्कालीन गाळेधारकाचे नाव व सदर गाळ्याचा पत्ता दर्शवणारे).

६) व्यावसायिक वापरात असलेल्या गाळ्यांच्या बाबत (अनिवासी गाळे) महानगरपालिकेकडून देण्यात आलेला दि. १३.०६.१९९६ पूर्वीची गुमास्ता परवाना किंवा अन्य परवाना किंवा कराची पावती / भाडेदारी करारनामा / भाडेदारी पावती.

७) सामाजिक / शैक्षणिक वा अन्य संस्थांच्याबाबत सदर संस्थांच्या नोंदणीकरणाबाबत उचित प्राधिकरणाने दि. १३.०६.१९९६ पूर्वी दिलेले प्रमाणपत्र / भाडेदारी करारनामा / भाडेदारी पावती.

## विवरणपत्र "ब"

**त्या व्यतिरिक्त इमारतींमधील सद्या रहात असलेल्या गाळेधारकाचे सद्याचे अस्तित्व / भाडेदारी दर्शविण्यासाठी खालील पुरावे सादर करणे आवश्यक राहील :-**

१) सध्याच्या गाळेधारकाचे सदर गाळ्यातील अस्तित्व दर्शविणारा दि. ०१.०१.२०१७ ते दि. ३०.०४.२०१७ या कालावधीतील वीज देयक/दुरध्वनी देयक/ भाडेपावती / महानगरपालिकेची पावती / परवाना .

२) मूळ भाडेकरु मयत झालेला असेल तर, संचालक / व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळ यांनी सदर गाळ्याची भाडेदारी त्या भाडेकरुच्या कायदेशीर वारसांच्या नावे दि. ११.१२.१९८६ च्या पत्रातील तरतुदींच्या आधारे हस्तांतरण केली असल्यास त्या अनुषंगाने केलेला भाडेदारी करारनामा/हस्तांतरण आदेश.

३) कायदेशीर वारस वगळता अन्य हस्तांतरण प्रकरणात, मूळ गाळेधारक/भाडेकरू व सद्या रहिवाशी असलेल्या भाडेकरुमध्ये झालेला नोंदणीकृत करारनामा तसेच संचालक/व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळी यांनी निर्गमित केलेले हस्तांतरण आदेश/भाडेदारी करारनामा. मूळ मालकाने (ज्याच्या नावे भाडेदारी नियमित करण्यात आलेली होती) जर एखाद्या व्यक्तीला सदर गाळा हस्तांतरीत केला असेल व सदर व्यक्तिने सदर गाळा पुन्हा अन्य व्यक्तीला हस्तांतरीत केला असेल तर अशा प्रकरणी याबाबत सद्या रहीवाशी असलेल्या व्यक्तिस सदर सर्व करारनाम्याच्या / भाडेदारी हस्तांतरण आदेशाच्या प्रती उपलब्ध करुन देऊन स्वत:ची पात्रता सिध्द करणे आवश्यक राहील.

**********************************************************

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्रमांक : विविचा २०१६/प्र.क्र. २६१/गृनिप
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २४ एप्रिल, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय विविचा-१११०/(५९४७)/ गृनिप -१, दि.११.१०.१९९४.
२) शासन निर्णय क्रमांक : विविचा २००७/प्र.क्र. ५१ (भाग-१)/गृनिप, दि. ३०.०३.२०१६.
३) शासन निर्णय क्र. विविचा २०१६/प्र.क्र. २६१/गृनिप, दि. २८.०६.२०१७.

प्रस्तावना :-

शासनाच्या संदर्भाधिन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये मुंबईतील वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग व शिवडी येथील मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकासाकरीता लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांनी त्यांच्या दि.०२.११.२०१७ च्या पत्रान्वये सदर शासन निर्णयामध्ये काही सुधारणा/ बदल करण्याबाबत शासन स्तरावरुन योग्य तो निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पास गती येण्याच्या तसेच सदर प्रकल्पास अडथळे येऊ नयेत या उद्देशाने सदर शासन निर्णयात काही सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार, संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयामध्ये काही सुधारणा /बदल करण्यात येत आहेत.

शासन निर्णय -

संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयामध्ये , निर्णय क्र. २ च्या नंतर व निर्णय क्र. ३ च्या आधी निर्णय क्र. २-अ नव्याने अंतर्भूत करण्यात येत आहे-

"२-अ. शासन निर्णय दि. ११.१०.१९९४ मध्ये तरतूदी नसताना दि. १२.१२.१९९४ ते दि. २८.०६.२०१७ या कालावधीत झालेल्या भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरण (Transfer) प्रकरणामध्ये (वारसा हक्क/नातेवाईक तसेच शासन/ मा. न्यायालयाने विशिष्ठ प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार झालेली

...तांतरण प्रकरणे वगळून अन्य सर्व हस्तांतरण प्रकरणे) संबंधित गाळ्यातील सध्याच्या भाडेकरुकडून, निवासी गाळा असल्यास रु. २२५००/- प्रती गाळा व अनिवासी गाळा असल्यास रु.४५०००/- प्रती गाळा इतके दंडात्मक शुल्क संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांनी वसुल करून घ्यावे. संबंधित गाळेधारकांकडुन संचालक/व्यवस्थापक , मुंबई विकास विभाग चाळी यांनी उपरोक्त कालावधीत त्यांच्या स्तरावर नियमितीकरण/ हस्तांतरण आदेश निर्गमित करतांना संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयात अट "ब" येथे नमूद केलेली निवासी गाळ्याकरीता रु. १०,०००/- प्रती गाळा व अनिवासी गाळ्याकरीता रु. २०,०००/- प्रती गाळा इतके हस्तांतरण शुल्क वसुल केले असल्यास, उपरोक्त दंडात्मक शुल्कातून सदर रक्कम वजा करून उर्वरित रक्कम म्हणजेच निवासी गाळ्याकरीता रु. १२५००/- प्रती गाळा व अनिवासी गाळ्याकरीता रु. २५०००/- प्रती गाळा इतकी रक्कम दंडात्मक शुल्क म्हणुन वसूल करण्यात यावी."

२. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयामधील निर्णय क्र. ३ ऐवजी खालीलप्रमाणे सुधारित निर्णय क्र. ३ समाविष्ठ करण्यात येत आहे -

"३. बी.डी.डी. चाळीतील इमारतींमध्ये दि. १३.०६.१९९६ रोजी भाडेदारी अस्तित्वात असलेल्या व भाडेदारी नियमितीकरण झालेल्या व्यक्तीने अन्य व्यक्तीस भाडेदारीचे हस्तांतरण (विक्री) केलेल्या दि.२८.०६.२०१७ पर्यंतच्या प्रलंबित प्रकरणामध्ये संचालक, बी.डी.डी. चाळी यांनी भाडेदारी हस्तांतरणाबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. ही कार्यवाही करताना, सदर गाळ्यामध्ये संबधित गाळ्यामध्ये सध्या रहात असलेल्या व्यक्तीकडुन निवासी गाळा असल्यास रु. २२५००/- व अनिवासी गाळा असल्यास रु.४५०००/- इतके दंडात्मक शुल्क वसुल करण्यात यावे. सदर दंडात्मक रक्कम भरल्याबाबतची पावती, दि. १३.०६.१९९६ रोजी भाडेदारी अस्तित्वात असल्याबाबतचा विवरणपत्र "अ" येथील पुरावा तसेच सद्याचे अस्तित्व दर्शविणाऱ्या वैध पुराव्याच्या आधारे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांनी करावी तसेच नियमानुसार अन्य आवश्यक वसुली करण्यात यावी."

३. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयामध्ये , पुढीलप्रमाणे निर्णय क्र. ६ नव्याने अंतर्भूत करण्यात येत आहे-

"६. मुंबई विकास विभाग ( बी.डी.डी. ) चाळींतील मयत भाडेकरूच्या वारसा हस्तांतरण प्रकरणात संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी -

अ) वारसाच्या बाबतीत मुळ भाडेकरू मयत झाला असल्यास सदर सदनिका त्यांच्या हयात असलेल्या पती/ पत्नी यांच्या नावे हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी,

ब) मुळ भाडेकरू व त्यांचा पत्नी किंवा तिचा पती असे दोघेही मयत झाले असल्यास व अशा प्रकरणात एकच कायदेशीर वारस असल्यास त्याच्या नावे सदनिका हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी,

क) मूळ भाडेकरु व त्याची पत्नी किंवा तिचा पती असे दोघेही मयत झाले असल्यास व अशा प्रकरणात त्यांना एक्रापेक्षा जास्त कायदेशीर वारस असल्यास अशा प्रकरणात इतर कायदेशीर वारसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन कायदेशीर वारसाने नामनिर्देशित केलेल्या एका वारसाच्या नावे सदनिका हस्तांतरित करण्यात यावी.

ड) मूळ भाडेकरु व त्याची पत्नी किंवा तिचा पती असे दोघेही मयत झाले असल्यास व त्यांना एकापेक्षा जास्त कायदेशीर वारस असल्यास व वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्यात कोणाही एका वारसाच्या नांवे नामनिर्देश करण्यास सहमती होत नसल्यास, संचालक/ व्यवस्थापक मुंबई विकास विभाग चाळी यांनी अशा प्रकरणी सहमती पत्र दाखल करण्यासाठी १५ दिवसांची मुदत द्यावी. या मुदतीत सुध्दा नामनिर्देशनाबाबत सहमती न झाल्यास सदर गाळा संयुक्त नावाने हस्तांतरित करण्यात यावा. "

४. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयामध्ये , पुढीलप्रमाणे निर्णय क्र. ७ नव्याने अंतर्भूत करण्यात येत आहे-

"७. मुंबई विकास विभाग ( बी.डी.डी. ) चाळींतील पात्रता निश्चितिची कार्यवाही संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय तसेच या शासन निर्णयाद्वारे केलेल्या सुधारणा विचारात घेउन संबधित सक्षम अधिकारी यांनी करावी. त्याव्यतिरिक्त चाळीतील इमारतींमधील भाडेकरुंच्या ओळख प्रयोजनार्थ बायोमेट्रिक सर्वेक्षणाऐवजी छायाचित्र ओळख पुरावा (photo-identity proof) म्हणून ज्याच्या नावे भाडेपावती आहे, अशा

व्यक्तीचे आधार कार्ड, मतदार ओळख पत्र (Elector's Photo-Identity Card), पॅन कार्ड , पासपोर्ट किंवा अन्य शासकीय ओळखपत्र यापैकी एका पुराव्याच्या आधारे ओळख निश्चिती करण्यात यावी . "

५. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयाच्या विवरण पत्र 'अ" व विवरण पत्र 'ब" च्या ऐवजी सुधारित विवरण पत्र 'अ" व विवरण पत्र 'ब" समाविष्ट करण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१८०४२४११३४१४४००९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Manohar Ramchandra Parkar

Digitally signed by Manohar Ramchandra Parkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible]
Date: 2018.04.24 11:38:08 +05'30'

(म रा.पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
४) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७) मा. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
८) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा)
१०) महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा)
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
१२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई .
१३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई - ३२.
१४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा
१५) गृहनिर्माण विभागातील सह सचिव / उप सचिव / अवर सचिव

## विवरणपत्र "ब"

त्या व्यतिरिक्त इमारतींमधील सद्या रहात असलेल्या गाळेधारकाचे सद्याचे अस्तित्व / भाडेदारी दर्शविण्यासाठी खालील पुरावे सादर करणे आवश्यक राहील :-

१. सध्याच्या गाळेधारकाचे सदर गाळयातील भाडेकरु म्हणून अस्तित्व दर्शविणारा दि.०१.०१.२०१७ ते २८.०६.२०१७ या कालावधीतील वीज देयक किंवा दूरध्वनी देयक किंवा भाडेपावती किंवा महानगरपालिकेची पावती किंवा परवाना देणे आवश्यक राहील. तथापि, वारसा हक्क/ जवळचे नातेवाईक यांची हस्तांतरण प्रकरणांमध्ये सदरील कालमर्यादा लागू राहणार नाही.

२. मूळ भाडेकरु मयत झालेला असेल तर, संचालक / व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळ यांनी सदर गाळ्याची भाडेदारी त्या भाडेकरुच्या कायदेशीर वारसांच्या नावे दि. ११.१२.१९८६ च्या पत्रातील तसेच दि. २८.०६.२०१७ च्या शासन निर्णयातील (संदर्भ क्र. ३) तरतुदींच्या आधारे हस्तांतरण केली असल्यास त्या अनुषंगाने केलेला भाडेदारी करारनामा/हस्तांतरण आदेश.

३. दि.१२.१२.१९९४ ते दि. २८.०६.२०१७ या कालावधीत झालेल्या भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरण (Transfer) प्रकरणामध्ये (वारसा हक्क/नातेवाईक तसेच शासन/ मा. न्यायालयाने विशिष्ठ प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार झालेली हस्तांतरण प्रकरणे वगळून अन्य सर्व हस्तांतरण प्रकरणे) संबधित गाळ्यातील सध्याच्या भाडेकरुकडून या शासन निर्णयातील परिच्छेद १ व २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसूल केल्याची पावती, सध्याच्या वास्तव्याचा पुरावा व संचालक , बी.डी.डी. चाळी यानी निर्गमित केलेले नियमितीकरण आदेश/ भाडेदारी करारनामा.

******************************************************

## विवरणपत्र "अ"

बी.डी.डी. चाळींतील इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या निवासी/अनिवासी गाळेधारक लाभार्थींची पात्रता निश्चितीकरीता आवश्यक असलेले पुरावे.

**दि. १३.०६.१९९६ या दिनांकास संबंधित गाळ्यांमध्ये भाडेदारी अस्तित्वात होती. हे दर्शविण्यासाठी खालीलपैकी कोणताही एक पुरावा सादर करणे आवश्यक राहील :-**

१) गाळ्यांची भाडेदारी दि.१३/०६/१९९६ पूर्वीपासून अस्तित्वात होती, याबाबत भाडे नोंदवही किंवा कार्यकारी अभियंता, मध्ये मुंबई (सा.बां.विभाग), वरळी मुंबई यांच्या कार्यालयातील पीआरबी रजिस्टर किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा १९९५-९६ चा निरिक्षण उतारा (Inspection Extract) किंवा दि. १३.०६.१९९६ पूर्वी प्रकाशित झालेल्या अंतिम मतदार यादीचा प्रमाणित उतारा (तत्कालीन गाळेधारकाचे नाव व सदर गाळ्याचा पत्ता दर्शवणारे). वरील पैकी कोणताही एक पुरावा संचालक, बी.डी.डी. चाळी यानी प्रमाणित करुन सक्षम प्राधिकारी याना उपलब्ध करुन द्यावा.

२) व्यावसायिक वापरात असलेल्या गाळ्यांच्या बाबत (अनिवासी गाळे) दि.१३-०६-१९९६ पूर्वी गाळ्यांचा वापर अनिवासी असल्याबाबतची माहिती भाडे नोंदवही तपासून संचालक/ व्यवस्थापक मुंबई विकास विभाग यांनी सक्षम प्राधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी.

३) दि.१३-०६-१९९६ रोजी अस्तित्वात असलेल्या सामाजिक / शैक्षणिक व अन्य संस्थेकडून सदर संस्थांच्या नोंदणीकरणाबाबत उचित प्राधिकरणाने दि. १३.६.१९९६ पुर्वी दिलेले प्रमाण पत्र किंवा भाडेदारी करारनामा/ भाडेदारी पावती. हा पुरावा/कागदपत्रे संचालक/ व्यवस्थापक मुंबई विकास विभाग चाळी, मुंबई यांच्याकडून सक्षम प्राधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. संचालक/ व्यवस्थापक मुंबई विकास विभाग चाळी, मुंबई यांच्याकडे सदर कागदपत्रे उपलब्ध नसल्यास संबंधित संस्थेकडून कागदपत्रांची मागणी करण्यात यावी.

******************************

१६) अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), मुंबई शहर, मुंबई - ३२.

१७) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी (बी.डी.डी), वरळी, मुंबई

१८) सक्षम प्राधिकारी व उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.),कुलाबा विभाग, मुंबई शहर, मुंबई - ३२.

१९) सक्षम प्राधिकारी उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), धारावी विभाग, मुंबई शहर, मुंबई - ३२.

२०) निवड नस्ती - गृनिप.